# महावनवार्ता

सामाजिक संस्था-संघटनांचे मुखपत्र

सचिवालय पत्ता : युवा रूरल असोसिएशन, १२३/९, कुंभारे बिल्डींग, न्यु अमर नगर, चिखली रोड, मानेवाडा, नागपूर-४४० ०३४

| मुख्य संपादक | कार्यकारी संपादक | वृत्तसंपादक | संपादकीय मंडळ सदस्य |
|---|---|---|---|
| श्री. दत्ता पाटील | श्री देवराज बारदेसकर | गौरी शास्त्री-देशपांडे | श्री. दिलीप आखाडे |

दिनांक १५ ऑगस्ट २०१९ अंक - १ ला

## संपादकीय....

**दत्ता पाटील**

**पु**र्वीच्या तुलनेत सध्या एकूणच परिवर्तनाचा वेग खूपच वाढला आहे. आर्थिक व राजकीय धोरणात्मक बदलामुळे अनेक सेक्टरना नवनवीन आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. पण जवळ जवळ सर्व सेक्टर मधील लोक अशा आव्हानांना एकत्र येऊन सामोरे जातात आणि बदल जर त्यांच्या फायद्याचे नसेल तर तो न स्वीकारता त्याचा विरोध करतात व योग्य, सहाय्यकारी आणि पूरक ध्येय धोरणे व वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न करतात.

स्वयंसेवी विकास संस्था हा सेक्टर खूप वर्षापासून अस्तित्वात आहे. या सेक्टरने देश उभारणीमध्ये आणि देशाच्या विकासामध्ये भक्कम योगदान दिले आहे. व्यावसायिक पद्धतीने विकासाचे कार्य करण्यासाठी प्रशिक्षित मानव संसाधन व आर्थिक मदत दाता संस्थांनी केली. शासनातर्फे देखील काही संस्थाना कामे करण्यासाठी आर्थिक पाठबळ दिले गेले. परंतु या सेक्टरच्या योगदानाला फारसी किंमत दिली गेली नाही. मूठभर लोकांच्या कामाला माध्यमे व सरकार उचलून धरते पण ते सेक्टर म्हणून नव्हे तर व्यक्तीविशेष म्हणून ती कामाची पावती दिली जाते.

अशा वेळी या सेक्टरने एकत्र येऊन आपले ज्ञान, अनुभव, माहितीची देवाण-घेवाण करावी, सेक्टर म्हणून आंतरिक बळकटी निर्माण करावी, दाता वर्ग, शासन प्रशासन व उद्योग विश्व यांच्या सोबत शाश्वत विकासाच्या अजेंड्यावर समान पातळीवर येऊन कार्य करण्याचा आग्रह धरावा, या सेक्टरचे महत्व पटवून द्यावे, मान्यता मिळवावी यासाठी महावनची निर्मिती झाली आहे.

महावन हे महाराष्ट्रातील अशा सर्व संस्था संघटनांचे एक व्यासपीठ म्हणून उदयास येते आहे. अनेक संस्था अधिकृत सदस्यत्व स्वीकारत आहेत. हे मुखपत्र देखील या प्रयत्नांचाच एक भाग आहे. महावनचे अगदी पहिले वार्तापत्र आपल्या सर्वांपर्यंत पोहोचवताना राज्य समन्वयक आणि संपादक या नात्याने खूपच आनंद होत आहे. माझे सर्वाना आग्रहाचे निवेदन कि, जास्तीत जास्त संस्थांनी महावनचे अधिकृत सदस्य बनावे. आणि सेक्टर म्हणून सामाजिक संस्था व संघटना याची एकजूट करावी.

**आपणा सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**



## आम्ही कोण ?

संकट काळी दुसऱ्यांना उपयोगी पडणे हा मानवी स्वभाव. पूर्ण मानवी जीवनच परोपकारी जीवन आहे, कदाचित ते इतर प्राण्यांमध्ये पाहायला मिळणार नाही. या मूळ स्वभावाचा भाग म्हणून स्वयंस्फुर्तीने भारावून जाऊन, समाजाचे ऋण लक्षात घेऊन किवा आध्यात्मिक अधिष्ठानातून ठराविक मानवी समूहाच्या अडचणी, गरजा लक्षात घेऊन काही मंडळी एकटेपणाने किवा एकत्र येऊन संघटनात्मक व व्यावसायिक स्वरुपात मदत करतात, हातभार लावतात असे चित्र मानवी समाजात अगदी प्राचीन असावे. भारत देशही याला अपवाद असूच शकत नाही.

अगदी ब्रिटीश काळात देखील अशा पद्धतीने अनेक संघटनांनी कार्य सुरु केले होते. पण राजकर्त्यांना कदाचित त्याचे भय वाटले असावे आणि मग अश्या कारवायांना काबूत ठेवण्यासाठी म्हणून १८६० चा संस्था नोंदणी कायदा तयार करून अशा सर्व संस्थाना त्या कायद्याखाली नोंदणी करण्यास भाग पाडले असावे. एका बाजूने अशा कामास कायदेशीर मान्यता मिळवून देण्याचा आभास नक्कीच असेल पण त्याच वेळी अशा संघटनांनी काही गैर केले तर त्यांच्यावर अंकुश ठेवणे व नियंत्रण राखणे हा हेतूपण असणार. अर्थात,सामाजिक संस्था वा संघटना असामाजिक कार्यात शिरू नयेत म्हणून त्यांच्यावर नियंत्रण असणे आवश्यकच आहे. पुढे स्वातंर्त्योत्तर काळातसुद्धा १९५० चा विश्वस्त नोंदणी कायदा देखील आणला गेला. अलीकडे अशा संस्थाना कंपनी कायद्याखाली सुद्धा नोंदणी करता येते.

परंतु या सर्व कायद्याअंतर्गत नोंदणीकृत होणाऱ्या संस्था विविध प्रकारची कामे करतात हे आपल्याला दिसते. ढोबळ मानाने जर याचे वर्गीकरण केले तर असे दिसते कि महिला मंडळे, युवा मंडळे, भजनी मंडळे, गणेश मंडळे, स्पोर्ट्स क्लब अशा प्रकारच्या सांस्कृतिक कामात गुंतलेला एक गट पडतो. त्याला आपण पहिला गट म्हणू या. मोठ मोठी शाळा, विद्यालये व महाविद्यालये, हॉस्पिटल्स असा एक गट दिसतो. त्याला आपण दुसरा गट म्हणू. कौटुंबिक ट्रस्ट, सरकारी संस्था, मोठ मोठ्या कंपन्यांनी सुरु केलेल्या ट्रस्ट -संस्था असा अजून एक गट सध्या उदयास येताना दिसतो. त्याला आपण तिसरा गट संबोधू शकतो. त्याच बरोबर अभ्यासपूर्वक, शास्त्रीय व व्यावसायिक पद्धतीने विकास विषयक हस्तक्षेप करून सामाजिक परिवर्तन घडवून आणणारा एक गट सत्तरीच्या दशकापासून कार्य करताना दिसतो. ज्याला आपण चौथा गट म्हणू. यामध्ये पहिला दुसरा, तिसरा अशी काही वर्गवारी नाही. पण विषय समजून घेण्याकरिता तात्पुरते चार गट आपण मानू या.

**श्री. दत्ता पाटील**
**राज्य निमंत्रक, महावन**

चौथ्या गटाने आपल्या देशात सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याचे मोठे कार्य केले आहे व कमालीचे योगदान दिलेले आहे. परंतु, यात कोणत्या गटाने नक्की काय योगदान दिले, हे अधोरेखितच झाले नाही. हे कार्य करण्यामध्ये अनेक दाता संस्थांचा व शासनाचा वेळोवेळी आर्थिक सहयोगही मिळाला आहे. परंतु, एकाच प्रकारच्या कायद्याखाली सर्वच वरील गटात मोडणाऱ्या संस्था नोंदणीकृत असल्याने या योगदानाला गटश: पावती मिळणे कठीण जाते. हा एक महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे एखाद्या इतर वर्गातल्या संस्थेने काही गैरकृत्य केले तर त्याचा दोष सर्वच संस्थाना जातो. वास्तविक वर उल्लेखिलेल्या प्रत्येक गटाचे स्वत:चे असे विशिष्ट काम व कार्य प्रणाली असते, ताकद असते आणि मर्यादापण असतात. परंतु सर्वांना एकाच तराजुमधून मोजले जाते किवा एकाच चष्म्यातून पहिले जाते. हे कुठेतरी चुकते. वास्तविक पाहता वेगवेगळ्या स्वरूपाचे काम करणाऱ्या संस्थाना वेगवेगळ्या कायद्या अंतर्गत नोंदणी करण्याची मुभा पाहिजे किंवा तशी तरतूद पाहिजे तरच प्रत्येक गटातील संस्थाना त्यांची अचूक ओळख मिळू शकेल. हा ओळखीचा तिढा शासनाने लवकरच सोडवला पाहिजे असे वाटते.

या पुढची अजून एक अडचण आहे आणि ती म्हणजे या चौथ्या वर्गात मोडणाऱ्या संस्थाना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते जसे - एन. जी. ओ.-गैर सरकारी संस्था, सिव्हील सोसायटी ऑर्गनायझेशन, स्वयंसेवी संस्था, ऐच्छिक संस्था, सामाजिक संस्था, ऐच्छिक विकास कार्य संस्था इ. या प्रत्येक नावाला त्याच्या विशिष्ट कडा आहेत. या सर्व विविध कंगोऱ्यांमुळे या क्षेत्रातील-गटातील संस्थांचे अस्तित्व व महत्व समोर येत नाही. त्यामुळे त्यांचे खूप मोठे विकासातील योगदान पूर्ण लपून जात आहे.

त्यामुळे आता असा प्रश्न उभा राहतो की, या गटाची-सेक्टरची नेमकी ओळख काय, याही वर जाऊन या गटात मोडणाऱ्या संस्थाना प्रश्न पडतो तो हा कि आम्ही नक्की कोण? हा तिढा देखील सर्वांनी मिळून लवकर सोडवावा, इतका महत्वाचा मुद्दा आहे...



# जिल्हा निमंत्रकांचा परिचय



## जिल्हा अमरावती

### डॉ. मधुकर गुंबळे


पत्ता : गुरुकुंज मोझरी, ता. तिवसा. जि. अमरावती
मोबाईल नं : 9422190811,
इमेल आय डी : apekshasociety@gmail.com
संस्थेचे नाव : अपेक्षा होमियो सोसायटी
संस्थेचे उपक्रम : बालहक्क, बालमजुरी, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला व एकल महिला, बालमृत्यू थांबविण्यासाठी शासकीय सेवा देखरेख व मदत.
कार्यक्षेत्र : अमरावती व गडचिरोली जिल्हा



## जिल्हा गडचिरोली

### श्री रुपचंद दखणे

पत्ता : मु.पो.घाटी, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली
मोबाईल नं : 9112074733,
इमेल आय डी : gramarogya@rediffmail.com
संस्थेचे नाव : ग्रामआरोग्य, घाटी
संस्थेचे उपक्रम : नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, उपजीविका, शिक्षण, योग निसर्गोपचार, सेंद्रिय शेती, वनाधिकार, पेसा
कार्यक्षेत्र : गडचिरोली जिल्हा



## जिल्हा बीड

### एच.पी.देशमुख


पत्ता : अक्षय निवास,धारूर रोड, केज, जिल्हा बीड. (431123)
मोबाईल नं : 9422543283,
इमेल आय डी : yuvagram100@gmail.com
संस्थेचे नाव : युवाग्राम विकास मंडळ,केज.
संस्थेचे उपक्रम :
1.जलवैभव प्रकल्प, 2.पाणलोट क्षेत्र विकास,3.उपजीविका प्र.शि.संस्था, 4.प्रकल्प प्रशिक्षण संस्था,5.प्रकल्प अंमलबजावणी संस्था 6.अनाथआश्रम (बालग्रह), 7. बालकामगार पुनर्वसन विशेष प्रशिक्षण केंद्र, 8.चाईल्ड हेल्प लाईन, 9.महिला मायक्रो फायनान्स,10.अपंग पुनर्वसनकेंद्र (टाकाऊ पासून टिकाऊ) सतरंज्या तयार करणे.
कार्यक्षेत्र : बीड,उस्मानाबाद, लातूर, नांदेड, अहमदनगर व रायगड.



## जिल्हा नागपूर

### श्री राजीव थोरात

पत्ता : लोणारा वार्ड क्र. 3, गुमथी रोड, सावरमेंढा रोड, नागपूर - 441111
मोबाईल नं : 9422120011
इमेल आय डी : issue2@rediffmail.com
संस्थेचे नाव : इंडियन सोशल सर्व्हिस युनिट ऑफ एज्युकेशन,
संस्थेचे उपक्रम : आरोग्य आणि पोषण आहार, शिक्षण, बालहक्क सुरक्षा व प्रचार प्रसार, नैसर्गिक संसाधन विकास संशोधन व प्रशिक्षण कार्यक्रम, महिला व बालविकास.
कार्यक्षेत्र : नागपूर शहर व ग्रामीण, यवतमाळ, वर्धा.



## जिल्हा नाशिक

### श्री भिला ठाकरे

पत्ता : 31 ए, कल्याणी नगर, आनंदवली शिवार, गंगापूर रोड, नाशिक -422013
मोबाईल नं : 9922155978
ईमेल : bhila.amd@gmail.com
संस्थेचे नाव : अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट
संस्थेचे उपक्रम : बहुविध्य सृजनशील माध्यम निर्मिती, सहशिक्षण, शोधिनी, माध्यमदूत
कार्यक्षेत्र : उत्तर महाराष्ट्र



## जिल्हा वर्धा

### श्री मिलिंद भगत

पत्ता : स्वयंम 3 स्वामी समर्थ नगरी, मुरारका ले आउट, बँचलर रोड, वर्धा
मोबाईल नं : 9850352387
इमेल आय डी : sadbhavnagvs@yahoo.co.in
संस्थेचे नाव : सदभावना ग्रामीण विकास संस्था
संस्थेचे उपक्रम : सूक्ष्म पाणलोट विकास तत्वावर आधारीत जलसंधारण प्रकल्प, पावसाच्या पाण्याचे संवर्धन, साठवण व भूजल पुनर्भरण.
कार्यक्षेत्र : वर्धा, जालना, चंद्रपूर, नागपूर



## जिल्हा चंद्रपूर

### श्री किशोर चौधरी

पत्ता : द्वारा.चंपतराव झि. सरदार पटेल वार्ड विवेकानंद कॉलनी, वरोरा जि.चंद्रपूर पिनकोड 442907
मोबाईल नं : 9511812667,
इमेल आय डी : vicharvikas@gmail.com
संस्थेचे नाव : विचार विकास सामाजिक संस्था
संस्थेचे उपक्रम : संसाधन व्यवस्थापन, मानवधिकार व सामाजिक न्याय, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प, बालमजूरी मुक्त अभियान, जैवविविधता कार्यक्रम, शिक्षणहक्क अभियान, वसुंधरा पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, एकल महिला संघटन
कार्यक्षेत्र : वर्धा, चंद्रपूर



## जिल्हा भंडारा

### श्री अविल बोरकर

पत्ता : ओल्ड टेलीग्राफ बिल्डींग, त्रिमूर्ती चौक, सिव्हील लाईन्स
मोबाईल नं : 9011942822
इमेल आय डी : gypmbhandara@gmail.com
संस्थेचे नाव : ग्रामीण युवा प्रागतिक मंडळ
संस्थेचे उपक्रम : दलित आदिवासी, भटक्या आणि विमुक्त महिला व बालकासाठी, नैसर्गिक संसाधन , शेतमजूर, लहान शेतकरी यांच्या प्रश्नांवर
कार्यक्षेत्र : भंडारा जिल्हा



## जिल्हा यवतमाळ

### श्री गजानन डाखोरे

पत्ता : काळे ले आउट, वार्ड नं. 17, मु.पो.ता. राळेगाव, जि. यवतमाळ.
मोबाईल नं : 9421852492
इमेल आय डी : gvdakhore@rediffmail.com
संस्थेचे नाव : प्रेरणा विकास संस्था
संस्थेचे उपक्रम : महिला सक्षमीकरण, अपंग पुनर्विकास, आदिवासी महिला आरोग्य, वनहक्क व पेसा, बायोएनर्जी
कार्यक्षेत्र : यवतमाळ जिल्हा

महावनवार्ता
सामाजिक संस्था-संघटनांचे मुखपत्र



# महावन : राज्य सुकाणू समिती बैठक



महावनच्या राज्य सुकाणू समितीची बैठक दिनांक २८ जून २०१९ रोजी वृंदावन नगरी, वासिंद, ता. शहापूर, जि. ठाणे येथे पार पडली. यावेळी राज्य सुकाणू समिती सदस्यांसह ११ संस्था प्रतिनिधींनी आपली उपस्थिती दर्शविली. यावेळी टाटा समाजिक विज्ञान संस्था (टीस) चे सी.एस.आर. हबचे प्रमुख मुकुंद गोरक्षकर व बालसंसद अभियानाचे प्रतिनिधी दयानंद पाटील यांना विशेषत्वाने आमंत्रित करण्यात आले होते.

महावन राज्य सुकाणू समिती निमंत्रक दत्ता पाटील यांनी बैठकीचा आरंभ व उपस्थितांचे स्वा गत केले. आढावा - मागील बैठकीचे अहवाल वाचन, आर्थिक हिशोब वाचण्यात आला.

त्यानंतर बालसंसद अभियानाबाबत माहिती देण्यात आली. राज्य निमंत्रकानी प्रारंभी त्याबाबत भूमिका मांडली. साधारण १५ ते १७ जिल्ह्यापर्यंत महावनची माहिती पोहचली. असून अन्य जिल्ह्याकडून प्रतिसाद येण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जिल्हा बैठका घ्याव्यात असे सर्वानुमते ठरले.

याशिवाय सदस्यता नोंदणी सद्यस्थिती व अभियान, सदस्य संस्थांच्या क्षमताविकासाकरिता आवश्यक गरजांचा आढावा घेणे, सेक्टर संदर्भातील बाह्य आव्हाने याशिवाय महावन उपक्रम व अंमलबजावणी यावर चर्चा करण्यात आली.


टाटा समाजिक विज्ञान संस्था, मुंबई- सी. एस. आर. हब माहिती-सहभाग व नोंदणी याबाबत घेण्याची काळजी व पद्धती याबाबत टाटा समाजिक विज्ञान संस्था (टीस) चे सी.एस.आर. हबचे प्रमुख मुकुंद गोरक्षकर यांनी मार्गदर्शन केले.

# बालसंसद अभियान प्रशिक्षण

महावनच्या पातळीवर बालकांच्या विकासाकरिता संवर्धक व समाजाच्या दृष्टीनेही पोषक अशाबालसंसद अभियानाची माहिती वेळोवेळी आपल्या पर्यंत पोहोचली आहेच. हे अभियान राबविण्याकरिता काही प्रशिक्षण मिळावे याकरिता CSA द्वारे व महावनच्या पुढाकारातून दि २४ ते २७ सप्टेंबर २०१९ दरम्यान महाराष्ट्रातील मध्यवर्ती ठिकाणी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. या करिता महावन संपर्कातील संस्था आमंत्रित आहे. यात प्रामुख्याने महावन सद्स्यत्वाची अधिकृत नोंदणी करणाऱ्या संस्थाना अग्रक्रम देण्यात येणार आहे. (तेथिल निवास व्यवस्था प्रशिक्षक संस्थेतर्फे करण्यात येईल तसेच प्रवास खर्च रुपये १२०० च्या मर्यादेपर्यंत प्रती व्यक्ती दिला जाईल.)

- केवळ प्रशिक्षणार्थी प्रवेश मर्यादा केवळ ३० असून. एका संस्थेचे जास्तीत जास्त २ कार्यकर्ते प्रशिक्षणास उपस्थित राहू शकतात. २६ ऑगस्ट किंवा प्रवेशमर्यादा पूर्ण होईपर्यत प्रवेश दिला जाईल.

ज्या संस्था बालहक्क, बालशिक्षण या विषयात गावपातळीवर कार्य करीत आहेत त्यांनी या मोफत प्रशिक्षणाचा अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती. अधिक माहितीकरिता महावन सचिवालय येथे ७०८३३२८१५४ कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, ही विनंती.



**नमस्कार साथी,**

भारताच्या स्वातंत्र्यदिनी महावनवार्ताचा डीजीटल अंक प्रकाशित करताना आम्हास विशेष आनंद होत आहे. पुढे नमूद केलेले सदर अंकात वेळोवेळी उपलब्ध साहित्यानुसार प्रकाशित केले जाईल. याकरिता सर्व स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते यांनी मजकूर पाठवावा. सप्टेंबर २०१९ च्या अंकासाठी ५ सप्टेंबर पर्यंत साहित्य स्वीकारले जाईल.

साहित्य mahavanmaharashtra@gmail.com या इमेल वर पाठवावे.

# बालहक्कांसाठी विशेष उपक्रम

महाराष्ट्रातील आगामी निवडणुकीच्या निमित्ताने पक्षाच्या जाहीरनाम्यात बालकांच्या हक्काविषयी मुद्दे घालावेत, याकरिता मुंबईतील संपर्क संस्थेच्या वतीने भाजपचे पक्ष जाहिरनामा समिती सदस्य श्री माधव भंडारी यांची भेट घेण्यात आली व त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातील निवडणुकीच्या निमित्ताने विविध राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात मुलांचे मुद्दे यावेत याकरिता या नेत्यांशी चर्चा करण्यात येत असून बालकांच्या प्रश्नांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा हा प्रशंसनीय उपक्रम आहे.

यावेळी संपर्कने तयार केलेल्या जाहिरनाम्यासोबतच शिक्षण हक्क मंचचा जाहीरनामाही त्यांना देण्यात आला. हा जाहीरनामा शिक्षण हक्क मंच, बालमजुरी विरोधी अभियान मंच व आद्य बाल विकास मंच यांनी संयुक्तपणे तयार केला आहे.

या उपक्रमात महावनच्या राज्य सुकाणू समिती सदस्य हेमांगी जोशी या महाराष्ट्र शिक्षण हक्क मंचच्या निमंत्रक म्हणून यात सहभागी झाल्या होत्या. त्या गेली २० वर्षे समाजकार्यात अग्रेसर असून शालेय शिक्षण क्षेत्रात त्यांची विशेष कामगीरी आहे. शिक्षण हक्क कायदा, शाळा व्यवस्थापन, शिक्षणाचे खाजगीकरण, शिक्षक व शाळा जबाबदारी, बहुभाषिकता आधारीत शिक्षण, साक्षरतेसाठी बालवाचनालय - विचार व स्थापना, साक्षरता आणि भाषा-शिक्षण यामध्ये त्यांची विशेष तज्ञता आहे. .

बालहक्काच्या लढ्यातील महत्वाचे पाऊल म्हणून महावन या संपूर्ण उपक्रमाचे कौतुक करीत आहे.



## पुढील सदरासाठी साहित्य आमंत्रित आहे.

१. कव्हरस्टोरी - सेक्टरच्या दृष्टीने महत्वाच्या घटना उपक्रम निर्णय यावर अभ्यासपूर्ण लेख.

२. घडामोडी - सेक्टर मधील घडामोडी, विविध राज्यांमध्ये काय सुरू आहे. काय नवे घडतेय.

३. संस्था परिचय - महावन मध्ये सहभागी सदस्य संस्थाचा कार्य परिचय (प्रत्येक अंकात एक किंवा दोन संस्था)

४. संधी-उपलब्धता-सेक्टर ला उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम बैठका मनुष्यबळ. आर्थिकसहाय इत्यादी संधी बाबत माहिती

५. कार्यक्रम-राज्य पातळीवर होणारे कार्यक्रम/मीटिंग याबाबत माहिती.

६. उपक्रम/सिद्धता - स्थानिक, राज्य पातळीवर झालेल्या कार्यक्रम/मीटिंग याचा फोटोसह वृत्तअहवाल

७. प्रतिक्रिया/अपेक्षा/सल्ला- सहभागी संस्था -सदस्य पदाधिकारी यांच्या महावन वार्ताबाबत प्रतिक्रिया - अपेक्षा- सल्ला

८. माहिती असावे असे- सोशल सेक्टरच्या संदर्भांत होणारे बदल.

६. उत्तमोत्तम- आपल्या सदस्य संस्था संचालित करीत असलेला विशेष उपक्रम- योजना-प्रॅक्टीस

१०. नवनवीन - सामाजिक क्षेत्रातील समज वाढविण्यासाठी विविध विषयांवरील सदर.

११. लय भारी- सामाजिक क्षेत्रात-राजकीय क्षेत्रात-उद्योग जगतात- शिक्षण जगतात सामाजिक उत्थानास हातभार लावता येईल असे काही घडलेला तपशील

# महावनवार्ता

सामाजिक संस्था-संघटनांचे मुखपत्र




**महावन** हे एक महाराष्ट्रातील संस्था संघटनांचे खुले व्यासपीठ आहे. अंतर्गत देवाण घेवाण, संवादाचे एक माध्यम, एक वाक्यता– संघटनांची एकी, अस्तित्व निर्माण, सरकार दरबारी व प्रशासकीय स्तरावर दखल घेतली जावी. सद्यपरिस्थितीत आपल्या सेक्टरचे साधे श्रेयनिर्देशसुद्धा समाजातून होत नाही, ही शोकांतिका आहे. यामागे आपल्या सेक्टरने एकी न दाखवणे, स्वप्रतिमा निर्माण न करणे, प्रचार व प्रसिद्धीकडेही दुर्लक्ष केल्यामुळे त्यामुळे कदाचित दखल घेतली जात नसावी. जनसंपर्क, प्रचार व प्रसिद्धी माध्यमांचा उपयोग पुरेसा व्हावा. व त्यानिमित्ताने सेक्टरचे योगदान व समाजपरिवर्तानातील महत्व सर्वासमोर यावे हासुद्धा महावनच्या अनेक उद्धेशापैकी एक महत्वाचा उद्देश आहे. तसेच प्रचार–प्रसार व संवाद या दृष्टीनेही हा अंतर्गत व बहिर्गत माध्यम म्हणून प्रयत्न आहे.

### उद्देश

- ❒ महावनची भूमिका, विचार, कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहोविणे. सर्व स्तरावर इतरही माहिती देणे.
- ❒ सेक्टरशी संबंधीत विविध सामाजिक–आर्थिक व राजकीय विषयावर वैचारिक देवाण–घेवाण घडवून आणणे.
- ❒ स्वयंसेवी संस्थाना जबाबदेही बनवणे आणि परस्पर सहकार्याची संस्कृती निर्माण करणे व त्याकरिता मार्गदर्शन करणे– करविणे व अभ्यासास चालना देणे.
- ❒ संस्था परिचय : उपक्रमांची प्रसिद्धी करणे. एकमेकांच्या कार्याचा परिचय करून घेणे, कार्य समजून घेणे आणि प्रोत्साहन देणे.
- ❒ विकास प्रक्रियेचे भागीदार म्हणून शासन व कार्पोरेट बरोबर समसमान भागीदारीचे वातावरण निर्माण करणे

### मुखपत्र कसे असेल?

- ❒ मासिक तत्वावर चालणारे डीजीटल माहितीपत्रक असेल. याची भाषा मराठी असेल.
- ❒ 4 पानांचे रंगीत बांधणीत विविध सदरे असतील .
- ❒ प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्या नंतर महावन सदस्यांना महावन गुगल ग्रुपद्वारे पाठविण्यात येईल. (साधारण १५ तारखेपर्यंत )
- ❒ यात सर्व सदस्या कडून साहित्य, माहिती, लेख, बातम्या सहभाग अपेक्षित आहे.
- ❒ लेख–प्रसिद्धी व नियोजनाबाबत संपादकीय निर्णय अखेरचा असेल परंतु सर्व सहभागी संस्था आपल्या सूचना पाठवू शकतात त्याची योग्य दखल घेण्यात येईल.

## महावन सदस्यत्व मोहीम सुरू

### सदस्यता शुल्क

- ★ ५० लाखांवर उलाढाल असणाऱ्या स्वयंसेवी संस्थाकरिता रु. ५०००/-
- ★ १० ते ५० लाखांपर्यंत उलाढाल असणाऱ्या स्वयंसेवी संस्थाकरिता रु. २५००/-
- ★ असोसीएट मेंबर्स करिता रु.५००/- ('असोसीएट मेंबर्स यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही.)


### सदस्यत्वाच्या फॉर्म बरोबर लागणारी कागदपत्रे-

- ★ सदस्यत्वाचा पूर्ण भरलेला फॉर्म
- ★ सदस्यता फी चेक द्वारे
- ★ अलिकडचा ऑडिट रिपोर्ट
- ★ अलिकडचा वार्षिक अहवाल
- ★ नोंदणी प्रमाणपत्र
- ★ एफसीआरए प्रमाणपत्र
- ★ १२ ए नोंदणी प्रमाणपत्र
- ★ 80 जी प्रमाणपत्र
- ★ एनजीओ दर्पण नोंदणी क्रमांक
- ★ संस्थेवर कोणतीही केस नसल्याचे प्रमाणपत्र

### अकौंट डीटेल्स -

- ■ BANK: Kotak Bank
- ■ ACCOUNT NAME: Yuva Rural Association Mahavan
- ■ ACCOUNT NO: 2413636081
- ■ IFSC : KKBK0001839
- ■ BRANCH: Medical Square Nagpur

## राज्य सुकाणू समिती सदस्य परिचय



**राज्य निमंत्रक**

### दत्ता पाटील

समाजशास्त्र अभ्यासक (एम.ए). युवा रुरल असोसिएशनचे महासंचालक. औद्योगिक व शासकीय सेवेचा अल्पसा अनुभव घेवून गेली ३६ वर्षे अविरत विकासकर्मी म्हणून अविकसित समाज घटकांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात कार्य. विविध संस्थांच्या कार्यकारी मंडळात महत्वाची पदे. मानवी हक्क, भारतातील सहस्त्रकाची ध्येये व सध्या शाश्वत विकास ध्येये या करिता पहिल्या फळीतील सूत्रधार. संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय बैठकीमध्ये १३ पेक्षा अधिक देशात सहभाग. सामाजिक प्रश्नाबाबत मांडणी व सहभाग.

कार्यकर्ता निर्माण, प्रकल्प/संस्था व्यवस्थापन, विकास प्रकल्प निर्माण, मानवी हक्क, संसाधन विकास या विषयावरील तज्ञ मार्गदर्शक. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यशाळा व परिषदेत सक्रीय सहभाग.



**राज्य सुकाणू समिती सदस्य- (यवतमाळ)**

### डॉ. किशोर मोघे

बी. एच.एम.एस व एम.डी शिक्षण पूर्ण केल्या नंतर १९८५ पासून सामाजिक कार्यात अग्रेसर. ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट या सामाजिक संस्थेचे कार्यकारी संचालक. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन व उपजीविका, समुदाय आरोग्य, बालहक्क संरक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिला सक्षमीकरण, यावर विशेष कार्य.

स्वशासन सक्षमीकरण या विषयात तज्ञता. यावर प्रामुख्याने विविध ग्रामसभांमध्ये मार्गदर्शन कार्यक्रम. सिंगापूर, मलेशिया येथे झालेल्या सामाजिक संगोष्टीत उल्लेखनीय सहभाग. आदिवासी विकासाकरिता मोहन धारिया यांच्या हस्ते पुरस्कार. ग्रामायण संस्थेचा पुरस्कार. अपंग व्यक्ती विशेष कार्य, येस फौंडेशन पर्यावरण कार्य व ग्रामीण विकास याकरिता विदर्भ वैभव पुरस्कार. विविध शासकीय व अशासकीय समिती–संघटनामध्ये महत्वाच्या पदांवर कार्यरत.



**राज्य सुकाणू समिती सदस्य- (ठाणे)**

### हेमांगी जोशी

राज्य सुकाणू समिती सदस्य– (ठाणे)
सामाजिक व शैक्षणिक बदलासाठी काम करणाऱ्या उन्नती संस्थेच्या संचालक संस्थापक. तसेच महाराष्ट्र शिक्षण हक्क मंच या राज्य–स्तरीय मंचाचे निमंत्रक. गेली २० वर्षे समाजकार्यात अग्रेसर. शालेय शिक्षण क्षेत्रात विशेष काम.

शिक्षण हक्क कायदा, शाळा व्यवस्थापन, शिक्षणाचे खाजगीकरण, शिक्षक व शाळा जबाबदारी, बहुभाषिकता आधारीत शिक्षण, साक्षरतेसाठी बालवाचनालय – विचार व स्थापना, साक्षरता आणि भाषा–शिक्षण, यांमध्ये विशेष काम व या विषयांसाठी प्रशिक्षक म्हणून तज्ञता.



**राज्य सुकाणू समिती सदस्य- (पुणे )**

### मॅथ्यू मट्टम

पुणे विद्यापीठातून एम.ए. एम. फिलची पदवी. गेली ३२ वर्षे महत्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थामधील कार्याचा अनुभव. आरोग्य, शिक्षण, आजीविका या विषयावर विशेष प्रभुत्व. ग्रामीण व शहरी भागातील विकासात्मक कार्य. सद्यस्थितीत सीडा व युथ एड फाउंडेशन, पुणे येथे विश्वस्त.
१६ पेक्षा अधिक देशांमध्ये संशोधन प्रबंध सादर.
संपूर्ण कौशल्य निर्माण आणि उद्योजकता विकास.
राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक
टीआयएसएस आणि सिम्बायोसिस मधील मानद प्रशिक्षक.



**राज्य सुकाणू समिती सदस्य- (मुंबई)**

### मोहन सुर्वे

निर्मला निकेतन समाजकार्य महविद्यालय, मुंबई येथून समाजकार्याचे पदव्युत्तर शिक्षण. १९८८ पासून सामाजिक कार्यात अग्रेसर. सद्यस्थितीत विकास सहयोग प्रतिष्ठाण संस्थेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत. याशिवाय विविध सामाजिक तसेच सहकारी संस्थांच्या कार्यकारीणीत महत्वाची भूमिका बजावित आहेत.

शाश्वत जीवनाधार, शिक्षण व संस्थात्मक बांधणी यावर विशेष कार्य. नुकताच इंटरनॅशनल सी.एस.आर द्वारे पाणी संवर्धन यावरील परिणामकारक नेतृत्वाचा पुरस्कार प्राप्त.

1995 मध्ये भारतातून युवक प्रतिनिधी म्हणून युनोच्या अधिवास या विषयासंबधी न्यूऑर्कला झालेल्या कॉन्फरन्स मध्ये युवकांच्या प्रश्नांबाबत मांडणी.

संस्थांमध्ये गट बांधणी, संस्थात्मक विकास, सहभागी संशोधन प्रक्रिया व कार्यकर्ता निर्माण यावर विशेष मार्गदर्शक म्हणून अनेक कार्यशाळांचे संचालन.



**राज्य सुकाणू समिती सदस्य- (मराठवाडा)**

### मंगला दैठणकर,

१९९८ पासून कार्यरत सोशल ॲक्शन फॉर असोसीएशन अँन्ड डेव्हलपमेंट (साद) संस्थेच्या संस्थापक,

समाजातील वंचित वर्गाकरिता विशेष कार्य. क्षमता विकास, सामाजिक विकास, नेतृत्व विकास आदी विषयांवर तज्ञता. वादा ना तोडो, महिलांवरील अत्याचाराचा अंत शक्य आहे, बाल हक्क अभियान, जमीन अधिकार आदी चळवळीत महत्वाची भूमिका. मराठवाडा विभागातील सामाजिक विकासात महत्वाचा सहभाग. समाजातील वंचित वर्गाकरिता विशेष कार्य. क्षमता विकास, सामाजिक विकास, नेतृत्व विकास आदी विषयांवर तज्ञता.

सदर डीजीटल मुखपत्र हे महावन-संस्था संघटनाचे व्यासपीठ द्वारा अंतर्गत प्रचार-प्रसारासाठी मर्यादित स्वरूपात अनौपचारीकरित्या नि:शुल्क वितरीत केल्या जात आहे.